# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६

## (सकाळी ०९-४५ ते ११-४५ वाजता)

**(क)** **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६, मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६, बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ व गुरूवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक १) :-**

**(१)** **श्री. अंबादास दानवे,** ॲड. अनिल परब, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असणे, शहराच्या पाणी प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी हाती घेण्यात आलेली समांतर जलवाहिनी योजना सुमारे २५ वर्षांपासून विविध टप्प्यांमध्ये प्रलंबित असणे, या कालावधीत शासन व संबंधित यंत्रणांकडून योजनेच्या पूर्णत्वाबाबत वारंवार आश्वासने देण्यात आली, मुदतवाढी जाहीर करण्यात आल्या, आराखड्यात बदल करण्यात आले, मात्र प्रत्यक्षात नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध झालेला नसणे, योजनेची कामे पूर्ण झाल्याचे दावे करण्यात येत असताना शहरातील अनेक भागांत अद्यापही वितरण जाळे, जलशुद्धीकरण केंद्र, पाईपलाईन जोडण्या, रस्त्यांची पुनर्बांधणी आदी कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांना आठ ते पंधरा दिवसांनी पाणी मिळत असून, उन्हाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर झालेली असणे, दुसरीकडे मराठवाड्यातील अनेक गावे व वाड्यांना शासनामार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू असल्याने जलव्यवस्थापनातील त्रुटी आणि नियोजनातील अपयश अधोरेखित होत असणे, सदर योजनेच्या विलंबामुळे प्रकल्प खर्चात किती वाढ झाली, संबंधित कंत्राटदारांवर अथवा अधिकाऱ्यांवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली, विलंबाबाबत कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली तसेच योजना पूर्ण होण्यासाठी निश्चित कालमर्यादा कोणती आहे, याबाबत जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, सदर बाब छत्रपती संभाजीनगर शहरातील लाखो नागरिकांच्या मूलभूत पिण्याच्या पाण्याच्या हक्काशी संबंधित असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ व गुरूवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)** (अनुक्रमांक २ व ३) :-

**(२)** **सर्वश्री अरुण लखानी,** श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात पाण्याचे नियोजन वेगवेगळया खात्यातून होत असल्यामुळे एकसूत्रता निर्माण होणे गरजेचे असणे, राज्यात हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, भूजलपातळीतील सातत्याने होणारी घट, वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे जलसंकट अधिक तीव्र होणे, नद्या, तलाव आणि विहिरीमध्ये तसेच गोड्या पाण्याच्या स्त्रोतांना दूषित पाणी मिसळून जलजन्य आजार निर्माण होत असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होत असणे, सूक्ष्म सिंचन, पीक नियोजन, भूजल व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे, यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) सारख्या उपक्रमांना अधिक बळ देण्याची आवश्यकता असणे, शहरी भागातही सांडपाण्याचे शास्त्रीय प्रक्रियेद्वारे पुनर्वापर करणे अत्यंत आवश्यक असून नागपूर येथे प्रक्रियायुक्त सांडपाणी औष्णिक वीज प्रकल्पांना पुरविण्याचा यशस्वी प्रयोग झाल्याने त्याचप्रकारे हेच मॉडेल राज्यातील इतर महानगरांमध्ये आणि शहरांमध्येही व्यापक प्रमाणावर राबविणे गरजचे असणे, पाणी मीटरिंग आणि पाण्याच्या कार्यक्षम वापराला प्रोत्साहन देणारी दररचना यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असून केवळ पुरवठा वाढविण्यावर भर न देता मागणी व्यवस्थापनावर लक्ष देण्याची नितांत आवश्यकता असणे, त्याकरिता राज्यात जलविषयक उच्चस्तरीय तज्ज्ञ गट स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(३)** **श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू,** डॉ.मनिषा कायंदे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यातील दिव्यांग, भिक्षेकरी, अनाथ मुले, एकल आणि विधवा महिला हे समाजातील वंचित घटक असून महागाईच्या भीषण तडाख्यातून त्यांना समाजाच्या मूळप्रवाहात आणण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक असणे, यासाठी शासकीय योजनांमध्ये क्रांतीकारी बदल करून गरजेनुसार नवीन योजना बनविण्याची वेळ आलेली असणे, दिव्यांग व्यक्तींना समाजात वावरण्यासाठी तसेच त्यांना सक्षम करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाच्या दृष्टीकोनात बदल करणे गरजेचे असणे, दिव्यांग विवाह योजना अद्ययावत करणे, अनाथ मुलांना प्रमाणपत्र मिळवण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी 'सिंगल विंडो क्लिअरन्स' उपलब्ध करून देणे, बालभिक्षेकरी ही

एक संघटित गुन्हेगारी असून अशा टोळ्यांवर 'मोक्का' अंतर्गत कडक कारवाई करणे, राज्यातील गरजू, एकल व विधवा महिलांसाठी विशेष योजना राबवून अशा महिलांना सक्षम बनविण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरूवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) (अनुक्रमांक ४ व ५) :-**

**(४) सर्वश्री धीरज लिंगाडे,** सुधाकर अडबाले, अभिजित वंजारी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"अमरावती महानगरपालिकेमध्ये माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये प्रशासक असणे, त्यामध्ये अमरावती शहरातील प्रभागातील डोअर टू डोअर स्वच्छता करणे व संकलित कचरा सकाळी कंपोस्ट डेपो वाहून नेण्यासाठी कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत ३०० कोटी रूपयांचा करार होणे, निविदा व त्यांचे सोबत करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये अनेक अनियमितता झालेल्या दिसून येणे, अमरावतीमध्ये नविन महानगरपालिका अस्तित्वास आल्यानंतर दिनांक ६ एप्रिल, २०२६ व दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी स्वच्छता देखरेख समितीचे आयोजन करण्यात येणे, सदर बैठकीमध्ये वाहनांना टेंडर अटीप्रमाणे माहे एप्रिल, २०२५ नंतर उत्पादित नवीन वाहने वापरणे अपेक्षित असताना करारनाम्यात माहे एप्रिल, २०२३ च्या वाहनांना परवानगी देण्यात येणे, कंत्राटदाराने दुसऱ्याच्या नावाने गाडया वापरत असणे, तसेच जानेवारी व मार्च महिन्यात कंत्राटदाराने प्रत्यक्ष काम सुरु केले असले तरी दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी सुमारे दहा महिन्यापूर्वीच कंत्राटदाराला ५ टक्के वाढ होईल, त्यामुळे महानगरपालिकेवर २ कोटी रुपयांचा अतिरिक्त भुर्दंड बसणे, यात २ टक्के ही अनामत रक्कम दोन वर्षाकरीता असणे, परंतु ती रक्कम १ वर्षापूर्वीच काढली असणे, तसेच महानगरपालिकेच्या स्थायी समितीने फक्त “अ” गटाला मंजूरी देण्यात आलेली असणे, परंतु “ब” गटाला मंजूरी दिली नसणे, तरीदेखील देयके निघत असणे, याबाबत निविदा प्रक्रिया परत करण्याची मागणी येथील नागरिकांकडून होत असणे, परंतु याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरील निविदा प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५)** **सर्वश्री योगेश टिळेकर,** प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यामध्ये शासनाने ओबीसी महामंडळाअंतर्गत उप कंपन्यांची स्थापना केलेली असणे, यापैकी गुरव आणि वीरशैव लिंगायत या समाजासाठी सन २०२३ मध्ये आर्थिक विकास महामंडळ यांची स्थापना करणे, त्याचप्रमाणे नाभिक, सोनार, तेली, बारी, लोणारी, वाणी, शिंपी, सुतार, लेवा पाटीदार, गुजर आणि आगरी या समाजासाठी ११ आर्थिक विकास महामंडळांची स्थापना सन २०२५ मध्ये केलेली असणे, या सर्व आर्थिक विकास महामंडळांसाठी प्रत्येकी ५० कोटी भाग वन विभागाची मंजुरी दिलेली असणे, परंतु सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये या सर्व आर्थिक महामंडळांची माहिती घेतली असता काही महामंडळास ४ कोटी व काही महामंडळास फक्त २ कोटी रुपयांचा निधी भाग भांडवल म्हणून वितरित करणे, म्हणजेच सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात नवीन उप कंपनीकरीता फक्त २४ कोटी रुपये भाग भांडवल म्हणून वितरित केलेला असणे, इतर मागासवर्गीय समाजाच्या या ज्या उप कंपन्या स्थापन केल्या होत्या त्याचा उद्देश सर्व समाजातील घटकांपर्यंत शासनाचा लाभ पोहोचविणे हा असताना या आर्थिक महामंडळामध्ये ७९५ लाभार्थींनी नावे नोंदविलेले असताना फक्त १७१ लाभार्थ्यांनाच त्याचा लाभ घेता आला असणे, निधी नसल्यामुळे हजारो समाज बांधवांना लाभापासून वंचित रहावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** **अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये –**

**(मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ व गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**"राज्यात स्वतंत्र अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली विकसित करण्याबाबत"** या विषयावरील श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील व इतर वि.प.स. यांचा दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र.८ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ४५४२ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना)**
**[अनुक्रमांक २ व ३]**

(२) **सर्वश्री संजय भेंडे, सुनील कर्जतकर, प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील गुणवंत खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने क्रीडा विभागामार्फत ‘मिशन लक्ष्यवेध’ तसेच ‘खेळो इंडिया’ प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, सदर योजनांच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी असून प्रशिक्षण केंद्रांमध्ये खेळाडूंकरिता ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, कुस्ती व शूटिंगसाठी आवश्यक दर्जेदार क्रीडा साहित्य उपलब्ध नसणे, निवासी प्रशिक्षण केंद्रांमध्ये महिला खेळाडूंसाठी स्वतंत्र व सुरक्षित सुविधा, सीसीटीव्ही व्यवस्था आणि मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले असणे, राज्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याकरिता ‘मिशन लक्ष्यवेध’ व ‘खेळो इंडिया’ प्रशिक्षण केंद्रांच्या अंमलबजावणीतील त्रुटी दुर करुन खेळाडूंना आवश्यक सुविधा, साहित्य व प्रशिक्षक उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपायययोजना."

(३) **सर्वश्री योगेश टिळेकर, प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"पुण्यातील कोंढवा परिसरातील मिठा नगर, कौसर बाग आणि काही ठिकाणे दहशतवाद्यांचे केंद्र बनलेले असणे, सदर परिसरातील अद्ययावत स्फोटक उपकरणांच्या निर्मितीसाठी तसेच दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण आणि नियोजन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चार सदनिका जप्त केल्या असणे, गत चार महिन्यांपासून बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर कोंढवा पोलिसांनी अटकेची कारवाई केली असून याच भागात अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करून दोन वेगवेगळ्या प्रकरणांत अफू आणि मेफेड्रोनसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन संशयितांना अटक केली असणे, सदर घटनांमुळे या परिसरामध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली असून, या परिसरातील भाड्याच्या घरात वास्तव्यास असणाऱ्या व्यक्तींची पोलिसांनी चौकशी करून परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याची आवश्यकता असणे तसेच कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये कर्मचारी संख्या वाढवून परिसरामध्ये गस्त वाढविण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(ग)** **लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(गुरूवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) ते (७)] –**

(१) **सर्वश्री गोकुळ गिते, चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्रात माहे डिसेंबर, २०२५ मध्ये पार पडलेल्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीनंतर झालेल्या राजकीय वैमनस्य व गटबाजीच्या पार्श्वभूमीवर पराभूत उमेदवार, त्यांचे कार्यकर्ते तसेच स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांना लक्ष्य करून खोटे, बनावट व गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करून त्यांना जाणूनबुजून कायदेशीर प्रक्रियेत अडकविण्याचे प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी समोर येणे, या घटनांमुळे निवडणुकीनंतर राजकीय सूडभावनेचे वातावरण निर्माण होऊन लोकशाही प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे, धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी गु.र.नं. ४०/२०२६ अन्वये गौण खनिज चोरीचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येऊन या प्रकरणात वाहनमालकांना तसेच प्रत्यक्ष घटनास्थळी कोणताही संबंध नसलेल्या पराभूत उमेदवारांना आरोपी करण्यात आल्याच्या गंभीर तक्रारी प्राप्त होणे, तसेच सदर गुन्ह्यात नमूद केलेले वाहन त्या दिवशी संबंधित पोलीस स्टेशन हद्दीत प्रत्यक्ष आलेच नसल्याचे जी.पी.एस. ट्रॅकिंग प्रणाली व आय.टी. ॲक्ट कलम ६५ अंतर्गत प्राप्त प्रमाणपत्राद्वारे स्पष्ट होणे, तरीही त्याकडे दुर्लक्ष करून राजकीय हेतूने कार्यवाही करण्यात येणे, या सर्व बाबींमुळे पोलीस प्रशासनाच्या निष्पक्षतेवर व कार्यपद्धतीवर प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची तसेच अशा स्वरुपाच्या इतर प्रकरणांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सत्यता पडताळून निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. इद्रिस नायकवडी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (अल्पसंख्यांक विकास व औकाफ)** लक्ष वेधतील :-

"अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी अल्पसंख्यांक विकास विभागाकडून कार्यवाही होणे गरजेचे असणे, अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधा, अल्पसंख्यांक शिक्षण संस्था / शाळा यांना मुलभूत सुविधा, अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती इत्यादीसाठी मदत होणे अपेक्षित असणे, परंतु गतवर्षी कोणताही निधी उपलब्ध झालेला नसणे,

त्यामुळे सन २०२५-२६ या अर्थसंकल्पात अल्पसंख्यांक विकास विभागासाठी किती निधीची तरतूद करण्यात येणे, तरतूद केलेल्या निधीतून किती निधी खर्चित झाला असणे, तरतूद करण्यात आलेला निधी कशासाठी व किती प्रमाणात खर्च झाला याचा तपशील, विनियोग न झालेला निधी किती व निधी अखर्चित राहणेचे कारण काय याबाबत जनतेमध्ये असलेली उत्सुकता, परिणामी संपूर्ण महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक समाजात पसरलेला तीव्र असंतोष तसेच शासनाप्रती चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(३)** **श्री. प्रमोद जठार, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"धर्मवीर संभाजी महाराज तमाम हिंदुस्थानचे प्रतिक असून त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान स्थान म्हणून संगमेश्वर कसबा (जि.रत्नागिरी) या ठिकाणी महाराजांच्या स्मारकासाठी सुमारे ४ एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, महाराजांच्या मरणोत्तर शौर्याचे व कार्योत्तर बलिदानाचे पुढच्या पिढीकरिता प्रबोधन व्हावे याकरिता ४ एकर क्षेत्र कमी असून किमान १०० एकर क्षेत्रावर सर्वसमावेशक राष्ट्रीय दर्जाचे स्मारक निर्माणाकरिता स्थानिकांनी आग्रही भूमिका घेतलेली असणे, सदर स्मारकामध्ये स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या धर्तीवर महाराजांच्या जीवनावर आधारीत आधुनिक संग्रहालय, इतिहास संशोधन केंद्र, सुसज्ज ग्रंथालय, शिवकालीन इतिहासाचे दर्शन घडविणारे विविध प्रकल्प, सभागृह, पर्यटक सुविधा केंद्र याकरिता अतिरिक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता असणे, सदर राष्ट्रीय स्मारकाच्या निर्माणाधीन कार्यात स्थानिक हजारो कोकणवासीय युवकांना रोजगारासह व्यवसाय करण्याची संधी निर्माण होऊन पर्यटनास गती मिळणे, राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव सर्वत्र प्रचलित असून धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि बलिदान याचे राष्ट्रीय प्रेरणास्थान म्हणून संगमेश्वर कसबा येथील सरदेसाई वाड्यासहित अतिरिक्त १०० एकर परिसरात भव्य दिव्य स्मारकाकरिता जमीन संपादित करुन निधी उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने माहे जुलै, २०२६ ते जून, २०२९ पर्यंतचे ठोक जलदर ठरविणे कामी सर्व ग्राहकांच्यावतीने हरकत व सूचनांची मागणी करुन विभागवार सुनावणी घेणे, सदर सुनावणीची माहिती जलसंपदा विभागाच्या सर्व कार्यालयांमार्फत सर्व ग्राहकांना पोहोचणे गरजेचे असतानाही अनेक ठिकाणी प्रत्यक्ष तसे न होणे, अनेक ग्राहकांना सूचना व हरकती देणेसाठी वेळ मिळाला नसणे, औद्योगिक, स्थानिक स्वराज्य संस्था (घरगुती), कृषी पंपग्राहक, सहकारी पाणीपुरवठा संस्था यांना जलसंपदाचा सविस्तर कार्यकारी सारांश व नवीन दर वाढीची माहिती वेळेत न मिळाल्यामुळे जलसंपदाचे ग्राहक हजर राहू शकत नसणे, दिनांक १८ जून, २०२६ ला नवीन क्षेत्रावर आधारीत माहे मार्च, २०२२ च्या दराच्या १३ पटीने जादा दर करणे, ते सहकारी पाणीपुरवठा संस्था व वैयक्तिक कृषी पंपधारकांना परवडणारे नसणे, माहे मार्च, २०२२ पूर्वीचे ठोक जलदर क्षेत्रावर आधारित व पिकानुसार असावेत, नवीन सिंचीत क्षेत्र आल्याने हंगामी पिकांचा प्रश्न येत नसून पीक आणि प्रत्यक्ष क्षेत्रावर आधारित पूर्वीप्रमाणे दर ठरवावेत अशी मागणी होत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. प्राजक्त तनपूरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाथर्डी (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील मिरी व तिसगाव व इतर ३३ गावांसाठी मंजूर करण्यात आलेली नळ पाणीपुरवठा योजना, १४२ कोटी रूपये खर्चाच्या या योजनेस दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व ३० सप्टेंबर, २०२२ रोजी देण्यात आलेले कार्यारंभ आदेश, काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदारास दिलेली २१ महिन्यांची मुदत संपल्यानंतरही सुमारे ४ वर्षाचा कालावधी होत असतानाही अद्याप योजनेचे काम पूर्ण नसणे, परिणामी तालुक्यातील ३३ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसणे, अवर्षण प्रवण या ३३ गावांत पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, यासाठी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्याची शासनावर आलेली नामुष्की, योजनेवर आजपावेतो शासनाचा झालेला कोट्यवधी रुपयांचा खर्च, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१२ (प्र.क्र.२०/२०१२) सि.व्य./महसूल दिनांक ८ मार्च, २०१८ या परिपत्रकाचे उल्लंघन करुन जांभाविली (चिखलोली) लघुपाटबंधारे योजना ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे विना परवानगी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मे.भारत सिरम्स आणि वॅक्सीन्स लि. या कंपनीने भूखंड क्र.२७/१ या सर्व्हे नं.२५/२ मध्ये केलेले बांधकाम, सदर बांधकाम हे बुडीत क्षेत्राच्या म्हणजे २०० मी.च्या आत असणे, सदर बांधकामामुळे धरणाचा पाणीपुरवठा दुषित होण्याची शक्यता, उक्त कंपनीला २५/२ भूखंडावर मंजूर असताना त्यांनी सर्वे नं. २५/१ मध्ये केलेले बांधकाम, पाटबंधारे विभागाची दिशाभूल करुन घेण्यात आलेली परवानगी, मे.भारत सिरम्स आणि वॅक्सीन्स लि. या कंपनीने नियमास / शासन परिपत्रकाला बगल देत केलेल्या बांधकामाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, उक्त विना परवानगी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दिलेली बांधकाम परवानगी तात्काळ रद्द करुन बांधकामावर विनाविलंब कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पावसाच्या अनियमिततेमुळे राज्यातील शेती व्यवसायात सातत्याने होत असलेले नुकसान, यामुळे शेतकरी पूर्णतः हवालदिल होणे, शेतकऱ्यांवर वाढते कर्ज, खरेदी केंद्रावर पिकाला मिळणारा कमी भाव तसेच योग्य बाजारभाव न मिळणे, यामुळे वाढत जाणाऱ्या आर्थिक संकटाला सामोरे जाण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर राज्यात शेतकरी आत्महत्या करणे, शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळावा यासाठी किमान आधारभूत किंमत (MSP) ठरवताना सध्याच्या 'A2+FL' या अपूर्ण सूत्राऐजी डॉ. एम. एस. स्वामिनाथन आयोगाने शिफारस केलेल्या 'C2' (सर्वसमावेशक खर्च) या सूत्राचा आधार घेणे, शेतजमिनीचे काल्पनिक भाडे आणि भांडवली व्याज मोजून येणाऱ्या एकूण 'C2' उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा जोडून सुधारित व वाढीव हमीभाव धोरणात्मकरित्या जाहीर करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे तात्काळ पाठपुरावा करणे,

त्याचबरोबर राज्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना हळदीचे उच्च प्रतीचे बेणे देऊन लागवड व हळद प्रोसेसिंगचे प्रशिक्षण हळद महामंडळाने देऊन शेतकऱ्यांच्या हळद पिकाला बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क) तारांकित प्रश्न**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी ते चोवीसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(ग) अर्धा-तास चर्चेची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** : **"अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतूक व हाताळणीसाठी एकत्रित निविदा धोरण लागू करण्याबाबत"** या विषयावरील श्री.अंबादास दानवे व इतर वि.प.स.यांची सर्वसाधारण अर्धा तास चर्चेची सूचना क्रमांक ३५० वरील दिनांक ९ जुलै, २०२६ रोजीच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : **(क)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "सन २०२४-२०२५ या वर्षाचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल" (२) "मार्च, २०२४ रोजी संपलेल्या कालावधीसाठी जल जीवन अभियानावरील निष्पादन लेखापरीक्षा अहवाल" (३) "मार्च, २०२४ रोजी संपलेल्या कालावधीचा अहवाल" व (४) "३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "सहाव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा अहवाल व स्पष्टीकरणात्मक ज्ञापन" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** शासनाच्या नगरविकास विभाग, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागांतर्गत दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीत प्रशासकीय नियंत्रणाखालील संस्था/ उपक्रमांना देण्यात आलेली कर्जे, कर्जरोखे, Letter of Comfort व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या थकहमी विषयीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) **"मराठा आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न"** या विषयावरील श्री.अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावावरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(च)** **"सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करण्याबाबत व तसेच सर्व पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ अन्वये जूनी पेंशनचा लाभ मिळण्याबाबत"** या विषयावरील श्री.अभिजीत वंजारी व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३९९ वरील चर्चेच्यावेळी दिनांक ३० जून, २०२६ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "सन २०२३ च्या दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन वरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासन क्रमांक २२१ च्या अनुषंगाने अधिक माहिती" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : "कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **कृषी मंत्री** : महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम २००९ कलम २२ चे पोट कलम (१) सह कलम ७ चे पोट कलम (१) मधील तरतुदीनुसार, "महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ दिनांक ७ जुलै, २०२६" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**चार : "विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल क्रमांक २०९ सभागृहास सादर करणे"**

**पाच : "विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा सन (२०२६-२०२७) चा पहिला अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे"**

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(गुरुवार, दिनांक २ जुलै, २०२६ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

चिपळूण (जि. रत्नागिरी) विकासाला अडथळा ठरलेल्या पूर रेषेचे तातडीने फेरसर्वेक्षण करण्याबाबत.

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३३ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

बालभारतीच्या धड्यात परराज्यातील लोकनृत्यांना प्राधान्य देण्यात आल्याबाबत.

(३) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३२ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून (Cervical Cancer) किशोरवयीन मुलींचे संरक्षण करण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या 'एचपीव्ही' (HPV) लसीकरण मोहिमेला राज्यभरात मिळालेला अत्यंत अल्प प्रतिसाद, अफवा व गैरसमजांमुळे मोहिमेचा उडालेला फज्जा आणि या लसीकरणाला तातडीने गती देण्याची आवश्यकता.

**सात : "निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप"**

**आठ : (क) लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(१) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जलजीवन मिशन योजनेअंतर्गत रोहा तालुक्यातील २६ गांवात पाणीपुरवठा योजना मंजूर होणे, माहे ऑक्टोबर, २०२६ मध्ये रुपये ३३ कोटी त्यासाठी मंजूर होणे, सदर योजना मंजूर होऊनही अडीच-तीन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप ही योजना प्रलंबित असणे, योजना अपूर्ण असल्याने या २६ गावातील नागरीकांचा रोष उत्पन्न झालेला असणे, या योजनेचे काम पूर्ण करणेचा कालावधी होऊनही संबंधित ठेकेदाराने अद्याप काम केलेले नसणे, काम प्रलंबित ठेवलेले असणे, त्यामुळे योजना कधीपर्यंत पूर्ण होईल या विषयी स्थानिक नागरीकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, ठेकेदाराने कामाची बोगस देयके सादर करुन अनुदान घेतले असल्याची स्थानिकांची भावना असणे, असे असूनही अद्यापही योजना पूर्ण होत नसल्याने या योजनेची सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदार यांचेवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(२) श्री. अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ता.पलूस, जि.सांगली येथील औद्योगिक वसाहतीची स्थापना साधारण ५० वर्षांपूर्वी सन १९७६ मध्ये झालेली असणे, ३५ एकरांच्या विस्तीर्ण वसाहतीत २०० भूखंड असून सध्या त्या ठिकाणी जवळपास १६० उद्योग सुरू असणे, त्यापैकी ९० टक्के इंजिनिअरिंग वर्क असून इतर १० टक्के अन्य उद्योग असणे, सध्या या वसाहतीत नवीन उद्योगांसाठी कुठेही जागा शिल्लक नसल्याने अधिक पटीने पलूस, सावंतपूर, रामानंद नगर, सांडगेवाडी येथे बरेच नवीन आणि जुने उद्योग सुरू असणे, या वसाहतीसह किर्लोस्कर कंपनीचा कोट्यवधींचा निधी शासनाकडे जमा होत असून देखील येथे रस्त्यांची झालेली दुरवस्था, अरुंद रस्ते, मंदीची लाट, त्यातच भरमसाठ वीजदराने उद्योजक बेजार असतानाच महावितरणने औद्योगिक वीजदर वाढवणे, या दरवाढीला उद्योजकांचा होणारा विरोध, नगरपालिका या क्षेत्रात निधी खर्च करीत नसल्याने रस्ते, पथदिवे व अन्य सुविधांचा अभाव, या परिसरातील सर्व विस्तृत/विस्थापित उद्योग एकाच ठिकाणी आणणे आवश्यक असणे, याठिकाणी धातुकामासाठी (मेटल वर्क) मोठी मागणी असून यासाठी कुशल कारागीर/ मनुष्यबळ असणे, त्यामुळे पलूस तालुक्यातील सांडगेवाडीमध्ये वाईन पार्कसाठी आरक्षित केलेला भूखंड अन्य उद्योगांसाठी खुला करण्याची औद्योगिक वसाहत सोसायटीकडून सातत्याने होणारी मागणी, नव्याने रोजगार मिळण्याच्या दृष्टीने पलूस तालुक्यातील आरक्षित औद्योगिक क्षेत्र खुले करावे तसेच नवीन औद्योगिक क्षेत्र उपलब्ध करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री अंबादास दानवे, संजय खोडके, पंकज भुजबळ, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात कृषी युरियाचा बेकायदेशीर वापर होत असल्याचे नुकतेच माहे जुन,२०२६ मध्ये उघडकीस येणे, बेकायदेशीर कृषी युरियाचा वापर करणा-या १५३ कंपन्यांची कृषी विभागाने केलेली तपासणी, सदर कंपन्यांमध्ये पशु आहार, प्लायवूड, रंग निर्मिती तसेच इतर काही औद्योगिक उत्पादनांसाठी अनेक कंपन्या कच्चा माल म्हणून युरिया वापरत असल्याचे समोर येणे, औद्योगिक युरिया वापरण्याची अट कंपन्यांना असतांना कृषी युरियाची तस्करी करुन तो औद्योगिक कंपन्यांना विकण्यात येत असून

राज्यात अशा टोळया कार्यरत असणे, सदर टोळ्यांमध्ये काही निविष्ठा विक्रेते असणे, औद्योगिक कंपन्या या परवान्याच्या क्षेत्रात येत नसल्याने सर्रासपणे बेकायदेशीर कृषी युरियाची तस्करी सुरु असणे, बहुतांश कंपन्यांकडून पशुआहार निर्मितीमधील अनुदानित युरियाचा गैरवापर व साठवणूक होत असून यामध्ये नामांकित कंपन्यांचा समावेश असल्याने याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन सदर कंपन्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) सर्वश्री सईद खान, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ठिकठिकाणी थोर व्यक्तिमत्वे व महापुरुषांच्या स्मारकांच्या उभारणीसाठी जनतेकडून सातत्याने मागणी होत असणे, तसेच शासन निर्णय क्र. स्मारक/२०२४/प्र.क्र.१५/सा.बां. (दिनांक १२ जानेवारी, २०२४) अन्वये राज्यातील महापुरुषांच्या स्मारकांना प्राधान्य देऊन तातडीने प्रशासकीय मान्यता, निधी वितरण व अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले असणे, तरीही सदर शासन निर्णयानुसार अपेक्षित कार्यवाही गतीने होत नसणे, अहिल्यानगर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक, बुलढाणा येथे माता जिजाऊ यांचे स्मारक तसेच अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे काम अद्याप प्रलंबित असणे, अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) येथे संत रुपलाल महाराज स्मारकासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी रुपये १० कोटी २६ लाखांचा विकास आराखडा शासनाकडे सादर केलेला असणे व मौजे जेठामलपूर येथे जागा निश्चित करण्यात आलेली असणे, तरीही सदर प्रस्तावांना शासन निर्णयानुसार अंतिम मान्यता व निधी उपलब्ध न झाल्याने स्थानिक जनतेत असंतोष निर्माण होणे, त्यामुळे शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून सर्व प्रलंबित स्मारक प्रकल्पांना तातडीने गती देण्याबाबत शासनाने केलेली अथवा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री.सुहास शिरसाट, श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ग्रामविकास विभागामार्फत दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना ग्रामीण भागातील गरिब, होतकरू युवकांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित केलेली असणे, या योजनेअंतर्गत अनेक प्रकल्प राबविण्यात येत असून अनेक अधिकारी / कर्मचारी कार्यरत असणे, त्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांचाही सहभाग असणे, विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याने या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या महिलेसोबत अश्लील चाळे करणे, शरीर सुखाची मागणी करणे, महिलांना नको ती कामे करायला लावणे, तपासणीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना महागडे गिफ्ट देणे, बेनामी संपत्ती गोळा करणे, इतर महिलांनी त्याबाबत तक्रार केल्यास त्यांना कामावरून काढून टाकणेबाबत धमकी देणे, प्रशिक्षण संस्थेची तपासणी करण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व मारण्याची धमकी देत असणे, यामध्ये त्या विस्तार अधिकाऱ्याला मुख्य परिचालन अधिकारी व उपमुख्य परिचालन अधिकारी हे साथ देत असणे, याबाबत तक्रार झालेली असणे व त्या तक्रारीवर कोणतेही कारवाई झालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(६) सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात हलाल प्रमाणीकरण मोठ्या प्रमाणावर सुरू असणे, 'FSSAI' आणि 'FDA' सारख्या कायदेशीर संस्था असतानाही 'हलाल इंडिया प्रा.लि.', 'हलाल सर्टिफिकेशन सर्विसेस इंडिया प्रा. लि.', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' अशा खाजगी संस्थांकडून धर्माच्या आधारे हलाल प्रमाणपत्रे दिली जात असणे, 'औषध आणि सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४०' मध्ये हलाल प्रमाणीकरणाची कोणतीही तरतूद नसताना देखील अशा प्रकारची हलाल सर्टिफिकेट खाजगी संस्थांकडून दिली जात असणे, महाराष्ट्र सरकारकडून दिल्या जाणाऱ्या 'आनंदाचा शिधा' मधील पामतेलाच्या पाकिटावरही हलाल चिन्ह आढळलेले असणे, तसेच हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या काही संस्थांनी (उदा. जमियत उलेमा-ए-हिंद) गंभीर

आतंकवादी प्रकरणांतील आरोपींना कायदेशीर मदत केल्याचे समोर आलेले असणे, त्यामुळे हलाल सर्टिफिकेशनच्या माध्यमातून जमा झालेला पैसा राष्ट्रविरोधी कृत्यांसाठी वापरला जात असल्याचे निदर्शनास येत असणे, उत्तरप्रदेश राज्यात हलाल सर्टिफिकेट देण्यावर बंदी आदेश लागू करुन त्यानुसार हलाल प्रमाणित खाद्य पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्री यावर बंदी घालण्यात आली असणे, त्याचप्रमाणे बंदी आदेश महाराष्ट्रात लागू करण्याबाबत अनेक स्वयंसेवी संस्था यांनी शासनास प्रस्ताव दिला असणे, त्यानुसार दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांना याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले असणे, त्यानुसार हलाल प्रमाणपत्रावर बंदी घालण्याच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७)** **डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्ह्यातील मौजे कृष्णापूर तर्फे शेवाळा येथे सन २०२४-२०२५ मधील अतिवृष्टीमुळे कयाधू नदीकाठावरील खरडलेल्या शेतजमिनींच्या शासकीय मोफत अनुदानासाठी तहसील अधिकारी व कृषी सहाय्यकांनी पाहणी यादी तयार केली असणे, परंतु स्थानिक महसूल अधिकाऱ्यांनी पैशांच्या प्रलोभनापोटी नदीपात्रात जमीन नसलेल्या, पूर बाधित न झालेल्या व कुटुंबात शेतजमीनच नसलेल्या अपात्र व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे समाविष्ट केली असणे, कमी क्षेत्र असणाऱ्यांना नियमाबाहेर जास्त रकमेचा लाभ देणे, भूमिहीन व्यक्तींना लाभार्थी बनवणे आणि मूळ पात्र शेतकऱ्यांना यादीतून वगळून शासकीय निधी हडप केला असणे, बनावट दस्तऐवज बनवून फसवणूक करणाऱ्या संबंधित लोकसेवकांवर आणि बोगस पंचनामा करणाऱ्या पंचांवर अद्याप कोणतीही फौजदारी कारवाई झाली नसणे, या कारभारामुळे कयाधू नदीकाठावरील खऱ्या बाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, या गंभीर घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी व पंचांवर तातडीने गुन्हे दाखल करणे, बोगस लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल करणे आणि पात्र शेतकऱ्यांची पुनर्निवड करून त्यांना तात्काळ अनुदान देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे. (जोडपत्र पहावे.)**

**नऊ : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**दहा : मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. प्रविण दरेकर यांनी श्रीमती सुषमा अंधारे, प्रवक्त्या, शिवसेना (उबाठा) गट व स्टँडअप कॉमेडियन श्री.कुणाल कामरा यांचेविरुध्द दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**अकरा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

(१) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'अमृत अभियान' (AMRUT) १.० आणि २.० अंतर्गत जलपुरवठा, मलनिस्सारण, सांडपाणी प्रक्रिया केंद्रे आणि पंपिंग स्टेशन यांसारखे महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबविण्यात येत असणे, या प्रकल्पांसाठी केंद्र शासन, राज्य शासन आणि महानगरपालिकेचा स्वत:चा हिस्सा, तसेच घेतलेली कर्जे आणि नागरिकांच्या करातून कोट्यवधी रुपयांचा प्रचंड निधी खर्च करण्यात आला असणे, परंतु, या प्रकल्पांच्या वित्तीय व्यवस्थापनात गंभीर त्रुटी आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचे निदर्शनास आले असणे, प्रकल्पांचा मूळ मंजूर खर्च, वेळोवेळी दिलेली सुधारित प्रशासकीय मान्यता, प्रत्यक्ष झालेला खर्च, निधीचा प्रवाह, कंत्राटदारांना दिलेली देयके, उपयोगिता प्रमाणपत्रे (UCs), महानगरपालिकेवरील कर्जाची जबाबदारी, व्याजाचा बोजा आणि लेखापरीक्षणातील आक्षेप यांचा कोणताही प्रमाणित व एकत्रित ताळमेळ सार्वजनिकरीत्या उपलब्ध नसणे, सध्या उपलब्ध असलेली वित्तीय विवरणे केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने प्रकल्पांच्या अंतिम लेखापरीक्षित स्थितीबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला असणे, हा थेट जनतेच्या पैशांचा प्रश्न असल्याने, शासनाने तातडीने एका उच्चस्तरीय विशेष वित्तीय परीक्षण समितीची स्थापना करणे, या समितीमार्फत संबंधित सर्व प्रकल्पांचे विशेष वित्तीय व कार्यप्रदर्शन लेखापरीक्षण (Performance Audit) करणे, तसेच आवश्यकतेनुसार दिनांक १ जानेवारी, २०१५ पासूनच्या सर्व निविदा, करार आणि भांडवली खर्चांच्या योजनांचे न्यायवैद्यक लेखापरीक्षण (Forensic Audit) करण्याची अत्यंत निकड असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** विक्रम काळे, किशोर दराडे**, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली भेसळखोर माफिया आणि प्रतिबंधित पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर धडक कारवाई सुरू असणे, दिनांक १ ते ५ जून या अवघ्या पाच दिवसांत राज्यभरात १९५ धाडी टाकून १९२ आरोपींना अटक करत सुमारे २ कोटींचा प्रतिबंधित गुटखा आणि घातक अन्नपदार्थ जप्त केले असणे, धाराशिव, धुळे, नांदेड ते पिंपरी-चिंचवडपर्यंत भेसळीचे अड्डे उद्ध्वस्त झाले असणे, बनावट दूध व रासायनिक पनीर हद्दपार झाल्याने खऱ्या दुधाला मागणी वाढून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असणे, परंतु, नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या घातक अन्नामुळे लहान मुले व वृद्धांमध्ये यकृत, किडनी निकामी होणे आणि कॅन्सरसारखे गंभीर आजार वाढत असणे, ग्राहकांचे प्राण वाचवणारी ही कारवाई केवळ मोहीम न राहता तो प्रशासनाचा 'स्थायी स्वभाव' बनणे आवश्यक असणे, राज्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या व ११ लाखांहून अधिक आस्थापनांच्या तुलनेत किमान ११०० अधिकाऱ्यांची गरज असताना एफडीएकडे सध्या केवळ ३०० अधिकारी उपलब्ध असणे, प्रयोगशाळा नसल्याने कारवाई नंतर भेसळीचा अहवाल येण्यासाठी ३ महिन्यांचा विलंब लागणे, त्यामुळे या धाडसत्राला पाठबळ देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला आर्थिक व प्रशासकीयदृष्ट्या सक्षम करणे, नव्या भरतीद्वारे अधिकाऱ्यांचा तुटवडा भरून काढणे, अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे आणि अन्न सुरक्षा कायदा अधिक कडक करून भेसळखोरांवर सदोष मनुष्यवधासारखे अजामीनपात्र गुन्हे दाखल करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**(३)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ – महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ग) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – श्री राम मंदिर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (रामटेक) विधेयक, २०२६

**तेरा : (गुरूवार, दिनांक ९ जुलै, २०२६, रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव) –**
**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री. एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, अंबादास दानवे, अरुण लाड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, वि.प.स.** यांचा **म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, महिला व बालकांवरील गुन्ह्यात होणारी वाढ, सायबर व आर्थिक गुन्हयांत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी असणे, राज्यात अंमली पदार्थाच्या घटना उघडकीस येणे, जातीय व सामुदायिक तणाव वाढविणे, कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी असणे, राज्यात खून, बलात्कार, दरोडे व खंडणीच्या घटनांमध्ये वाढ होणे, परफेक्ट वुमन मॅगझीनच्या माध्यमातून मुंबईमध्ये फॅशन शोचे आयोजन करुन त्यामध्ये मुली व महिला कलाकारांना मोठ्या बॅनरचे चित्रपट, शोमध्ये काम देण्याचे आश्वासन देऊन आर्थिक फसवणुकीचे रॅकेट सुरु असून याला पोलीसांचे संरक्षण मिळणे, सुमारे ६६९५ कोटी रुपयांच्या मिसिंग लिंक प्रकल्पावर उद्घाटनानंतर पहिल्याच पावसात लिकेज व खड्डेसदृश्य नुकसान आढळल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे, रस्ते पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच खड्डे पडणे, कंत्राटदारांवरील अपुरी कारवाई व दर्जाहीन कामे, देखभाल अभाव असणे, टक्केवारी वाढल्यामुळे कामाचा सुमार दर्जा, सरकारी जमिनीवर होणारे अतिक्रमणे, मुद्रांक शुल्क व नोंदणी प्रक्रियेतील अनियमिततेच्या वाढत्या तक्रारी, महसूल संहिता कलम १५५ चे वारंवार उल्लंघन होणे,अवैध उत्खनन सुरु असणे, यास जबाबदार असणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईत असलेल्या त्रुटी व होणारा विलंब, महसूल विभागातील भ्रष्टाचारांच्या अनेक तक्रारी असणे, परिणामी शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होणे व शासनाच्या महसूलाची होत असलेली लूट, महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडून अनधिकृत बांधकामावरील कारवाईत दिरंगाई होणे, वाढते शहरीकरण त्यामुळे रस्ते, ड्रेनेज व नागरी पायाभूत सुविधांवर पडणारा ताण व नागरीकांना सुविधा अपुऱ्या पडणे, नगररचना, विकास आराखडे, एफएसआय धोरणे आणि पुनर्विकास मंजूरीमध्ये राजकीय दबाव वाढल्याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही."

## – अशासकीय कामकाज –
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**चौदा : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२६- श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

(४) सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२६- श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

(५) सन २०२६ चे वि.प.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२६- श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(६)** सन २०२६ चे वि.स.वि क्रमांक २० **–** महाराष्ट्र समान नागरी विधेयक, २०२६ - श्री.परिणय फुके, वि.प.स. यांचे

**(७)** सन २०२६ चे वि.स.वि क्रमांक २४ **–** महाराष्ट्र नगरपालिका कायदे (दिव्यांग व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती) (सुधारणा) विधेयक, २०२६ - श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.प.स. यांचे

---

**(ख) अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत)** –

(१) **श्री.अमित गोरखे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १७**

**"**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती समाजाच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत दलित वस्ती सुधार योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत रस्ते**,** गटारे**,** पिण्याचे पाणी**,** समाजमंदिरे**,** विद्युत सुविधा**,** सार्वजनिक स्वच्छता आदी विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. मात्र**,** अनेक ठिकाणी सदर निधीचे इतर योजनांमध्ये वर्गीकरण करणे अथवा निधी इतरत्र वळवित असल्याने दलित वस्त्यांतील नागरिकांना अपेक्षित विकासकामांचा लाभ वेळेत मिळत नाही. त्यामुळे अनुसूचित जाती समाजामध्ये नाराजी निर्माण होत असून सामाजिक न्यायाच्या उद्देशालाच

बाधा पोहोचत आहे.अनुसूचित जातींसाठी राखीव असलेला निधी हा त्याच समाजाच्या विकासासाठी खर्च होणे आवश्यक असून तो इतर कोणत्याही कारणासाठी वर्ग करण्यात येऊ नये, अशी मागणी सातत्याने होत आहे. सामाजिक समता व संविधानिक हक्कांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे अनुसूचित जातीसाठी मंजूर करण्यात येणारा दलित वस्ती सुधार योजनेचा निधी कोणत्याही इतर योजनेत वर्ग अथवा वळविण्यात येऊ नये तसेच संबंधित निधी केवळ दलित वस्त्यांमधील विकासकामांवरच खर्च करण्यात यावा, याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ०५**

"मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५**

"मुंबईतील (विशेषतः दक्षिण मुंबई पूर्व किनारपट्टीवर ) मुंबई पोर्ट ट्रस्ट (BPT) ची सुमारे ७५० ते १८०० एकर जमिन आहे. जमिनीवर आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल, व्यावसायिक संकुले आणि हरित क्षेत्र विकसित करण्याबाबत शासन नियोजन करीत आहे. मुंबईत सेंट्रल व पश्चिम रेल्वे, नेव्ही आणि केंद्र शासनाच्या इतर विभागांच्या अखत्यारीत देखील अनेक मैदाने आहेत. हि मैदाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडून खेळाव्यतिरीत अनेक कार्यक्रम आणि सोहळे यांसाठी भाड्याने दिली जातात. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येमुळे आणि विकासकामांमुळे अस्तित्वात असलेली मैदाने अपुरी पडत आहेत. त्यामुळे खेळाडूंची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. सन २०३६ मध्ये ऑलिम्पिकचे यजमानपद मिळवण्याचा देशाचा प्रयत्न असणार आहे. परंतु मुंबईतील युवा खेळाडू सक्षम सराव आणि प्रशिक्षण कुठे करायचे हा यक्ष प्रश्न पडला आहे. यास्तव भावी पिडीच्या खेळातील

गुणवत्तेला वाव मिळण्यासाठी मुंबईतील केंद्र शासनाच्या विविध विभागांच्या अखत्यारीतील मैदाने सर्वसामान्य मुंबईकरांना खेळासाठी नाममात्र दरात किंवा मोफत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे**"**

## "राष्ट्रगीत."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ जुलै, २०२६.

**डॉ.विलास आठवले,**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद**.**